**सरकार विरुध्द दिलीप हाके**
**निशाणी क्र. ६५/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–९ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नाव — श्री. श्रीपाद वसंतराव मेहत्रे,**
वय — ५२ वर्षे, व्यवसाय — नौकरी– संशोधन अधिकारी, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, छत्रपती संभाजीनगर.
निवासस्थान– सिडको, एन–७, छत्रपती संभांजीनगर.

---

**<u>सरतपासणी अभियोग पक्षा करीता</u>**
**<u>विद्वान श्री. जे. आय. परकोटे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –</u>**

**१.** मी, सन–२०१५ सालापासून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समितीमध्ये संशोधन अधिकारी म्हणून नियुक्त आहे. सन–२०१७ मध्ये मी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणी समिती औरंगाबाद/ छत्रपती संभाजीनगर येथेच नियुक्त होते. त्या समितीमध्ये आम्ही चार सदस्य होतो. ह्या समितीमध्ये अध्यक्ष श्री. ई.जी. भालेराव, सदस्य–सचिव–श्री. ए. डी. शेजाळे, सदस्य श्री. डी.एस. कुळमेथे आणि मी सदस्य म्हणून असे कार्यरत होतो.

२. विवेकानंद महाविद्यालयाच्या मार्फत दिलीप यशवंत हाके यांचा धनवार –अनुसूचित जमाती प्रमाणपत्र पडताळणीसाठी प्रस्ताव आमच्या कार्यालयात प्राप्त झाला होता. त्या प्रस्तावाचे पत्र मला आता दाखविले, ते हेच आहे. यापत्रास **<u>निशाणी क्रमांक ६६</u>** देण्यात येत आहे. या प्रस्तावात दिलीप यशवंत हाके यांचे निर्गम उतारे, जमातीचे प्रमाणपत्र, कार्यालयाचे शिफारस पत्र व इतर नातेवाईकांचे कागदपत्रे असे प्राप्त झाले. आम्हाला दिलीप हाके यांचे मुळ स्वरुपात जमीतीचे प्रमाणपत्र, नमुना–फ प्रतिज्ञापत्र, शिफारस पत्राची मुळ प्रत असे कागद मुळ स्वरूपात मिळाले व इतर सर्व प्रतींमध्ये कागद मिळाले. आम्हाला मिळालेल्या कागदपत्रानुसार पोलीस दक्षता पथका मार्फत त्या कागदपत्रांची चौकशी करून घेतली. दक्षता पथकाचा अहवाल मिळाला. त्या दक्षता पथकाच्या अहवालाचे अवलोकन केले. त्यामध्ये असे आढळून आले की, अर्जदाराच्या दाव्याच्या विसंगत नोंदी आढळून आल्या. दिनांक १०.०२.२०१७ रोजी जे काही अर्जदार दिलीप हाके यांनी जे पुरावे सादर केलेले व दक्षता पथकाने पडताळणी सादर केलेले पुरावे यांचे अवलोकन करून अर्जदार दिलीप हाके यांच्या दाव्याच्या विसंगत नोंदी आढळल्यामुळे त्यांचे जमात प्रमाणपत्र हे रद्द व अवैध ठरविण्यात आले. निशाणी क्र.२१ मला आता दाखविला, यामधील परिच्छेद–७ मध्ये आमच्या समितीने एकमताने हा निर्णय घेतल्याचे नमुद केले. मला आता <u>निशाणी क्र.२१</u> आदेश दाखविला. हा आदेश आमच्या समितीने दिलेल्या आदेशाची प्रमाणीत नक्कल आहे. यावर उपसंचालक श्री. ए.डी. शेजाळे यांची स्वाक्षरी आहे. मी त्यांची सही ओळखतो. कारण मी त्यांच्यासोबत एक वर्ष काम केलेले आहे. मी आज त्या आदेशाची आमच्या कार्यालयातील मुळ प्रतीची प्रमाणीत प्रत आणलेली आहे. ही प्रमाणीत प्रत

सर्व समिती सदस्यांनी सही केलेली आहे. मला आता यादी निशाणी क्र. ६४ सोबत दाखल प्रमाणीत प्रत दाखविली. ती हिच आहे. यावर माझी समिती सदस्य म्हणून सही आहे तसेच इतर समितीचे सदस्यांची सुध्दा सही आहे. या सह्या मी ओळखतो. या आदेशाला **निशाणी क्रमांक ६७** देण्यात येत आहे. निशाणी क्र.२१ व निशाणी क्र.६७ हा एकच आदेश आहे. आमच्याकडे जात पडताळणीचे प्रकरण दाखल झाल्यानंतर सुनावणीसाठी अर्जदार हे हजर राहत असतात. मी दिलीप हाके यांना ओळखु शकनार नाही. कारण अनेक अर्जदार हे सुनावणीसाठी येत असतात, त्यामुळे सर्वांना ओळखता येणार नाही.

**सरतपास– संपला.**

**उलटतपासणी आरोपी करीता विद्वान श्री. ठाकरे ए.के., विधीज्ञ यांचे द्वारा–**

**३**. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.६७ आदेश मला आता दाखविला याच्या शेवटच्या पानावरती उपसंचालक यांची सही नाही. मला समन्समध्ये सर्व अभिलेख मध्ये घेऊन येण्याचे कळविले नव्हते. मी परवानगी घेऊन अभिलेख घेऊन आज रोजी आलेला आहे. हे म्हणने खरे आहे की, कोणतीही सुचना नसतांना मी अभिलेख घेऊन आलो. हे म्हणने खरे आहे की, निशाणी क्र.६७ वर माझी मुळ सही नाही. आमच्या समितीने माधुरी पाटील विरुध्द स्टेट ऑफ महाराष्ट्र या मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील निर्णयाप्रमाणेच चौकशी केलेली आहे. हे म्हणने खरे आहे की, या निशाणी क्र.६७ मधील आदेशाप्रमाणे आरोपींच्या भावांना जमात पडताळणी प्रमाणपत्र मिळाले होते. हे म्हणने खरे नाही की, दक्षता पथक बारकाईने अभ्यास न करता हा निवाडा केलेला नाही. हे म्हणने खरे नाही की, अर्जदार व त्याच्या भावाच्या नोंदी ह्या एकसारख्या होत्या. हे म्हणने खरे नाही की, कुटुंबामध्ये एका भावाला जात पडताळणी प्रमाणपत्र मिळते त्यानुसार त्या कुटुंबातील इतरांना रक्ताचे नाते असल्यामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र मिळते. हे म्हणने खरे नाही की, एखाद्या प्रकरणात वडीलांना जातपडताळणीचे प्रमाणपत्र मिळाले असल्यास त्यांच्या मुलांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळून जाते. हे म्हणने खरे नाही की, समितीने मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश माधुरी पाटील विरुध्द स्टेट प्रमाणे कामकाज केलेले नाही. हे म्हणने खरे आहे की, दक्षता पथकाने आम्हाला या मध्ये खोटे कागद दाखल केलेले आहे असे कळविलेले नव्हते. आम्हाला ज्या काही शंका–कुशंका आढळल्या त्यासाठी अर्जदाराकडुन त्याचे स्पष्टीकरण मागविले. निशाणी क्र.६७ आदेशामध्ये चौकशी समितीची चौकशी झाली, सुनावणी पार पडली, दक्षता समितीचा अहवाल आला व हे सर्व झाल्यावर काही त्रुटी आढळल्या म्हणून अंतिम आदेश पारीत करण्यापुर्वी अर्जदाराला पुन्हा त्या त्रुटींची पुर्तता करण्यास सांगीतले असे काही यात नमुद नाही.

**४**. हे म्हणने खरे नाही की, त्यामुळेच आरोपी विरुध्द फौजदारी कारवाई करा असे आम्ही जे महाविद्यालयास कळवीले ते आम्ही बेकायदेशीर महाविद्यालयास कळविले आहे. हे म्हणने खरे

नाही की, कोणतीही दक्षता न घेता खोटा निकाल आम्ही दिला. हे म्हणने खरे नाही की, मी सरतपासात खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास- संपला.**

**फेर तपास- काही नाही.**

समक्ष
**-/स्वाक्षरीत/-**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक- २०/०१/२०२६

श्रवणोत्तर स्वीकृती.
**-/स्वाक्षरीत/-**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद